दिनांक ३०/०८/२०१८

# प्रेसनोट

## पुणे पोलीस संकेतस्थळावर (punepolice.co.in) Online Tenant/PG (Paying Guest) Information Detail Form उपलब्ध केलेबाबत...

*****

पुणे शहराच्या वाढत्या लोकसंख्येत परगावाहुन येणा-या व्यक्तींची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. यामध्ये प्रामुख्याने विद्यार्थी, व्यावसायिक, कामगार यांची संख्या जास्त असुन सदर व्यक्ती हे प्रामुख्याने भाडेतत्वावर राहत असतात. सुरक्षितेच्या दृष्टीने पुणे शहर पोलीसांकडुन वेळोवेळी पुणे शहरात राहत असलेल्या भाडेकरुची माहिती घेतली जाते. सदर माहिती देताना नागरिकांना अडचणीं समोरे जावे लागते. ही बाब लक्षात घेवुन पुणे शहर पोलीसांकरवी दिनांक ०८/१२/२०१६ रोजी पासुन नागरिकांच्या सोईसाठी प्रथमच पुणे शहर पोलीस संकेतस्थळावर "Tenant Information Form" हा टॅब नव्याने सुरु करण्यात आलेला होता, परंतु सदर टॅबचा वापर करते वेळी काही तांत्रिक अडचणी येत असल्या कारणाने नागरिकांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

तरी वरील बाबींची दखल घेवुन पुणे शहर पोलीसांनी www.punepolice.co.in या संकेतस्थळावरील "Tenant Information Form" या टॅबला नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो, गृहमंत्रालय, भारत सरकार यांचे कडून सुरू करण्यात आलेले "http://www.mhpolice.maharashtra.gov.in" या संकेतस्थळाची लिंक दिलेली आहे. नमूद संकेतस्थळावर "online Services" या टॅबमध्ये नागरिकांच्या सोयी - सुविधे करीता विविध सोयी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. "online Services" मध्ये नागरिकांनी लॉगीन केल्यावर "Citizen Services" ह्या टॅब अंतर्गत Online Tenant/PG (Paying Guest) Information Detail भरता येईल. तसेच सदर "online Services" चा नागरिकांनी जास्तीत जास्त उपयोग करण्याच्या दृष्टिने फ्लोचार्ट (Flowchart) पुणे पोलीस संकेतस्थळावर देण्यात आलेला आहे.

सदरची Online Tenant/PG (Paying Guest) Information Detail भरण्याची सुविधा नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो,भारत सरकार यांचे कडुन उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कडून सदरचे पोर्टल महाराष्ट्र राज्यामध्ये नागरिकांच्या सेवेसाठी सुपुर्त करण्यात आलेले आहे. (सदर पोर्टलच्या अनुषंगाने येणा-या अडीअडचणींचा पाठपुरावा करावयाचे कामकाज संगणक विभाग, पुणे शहर पुर्तता करत आहे.)

## टेनंट इन्फरमेशन फॉर्म (भाडेकरू माहिती) सिटीझन पोर्टलवर उपलब्ध आहे.

## भेट द्या - www.mhpolice.maharastra.gov.in

⇩

Online Services या टॅब ला क्लिक करा.

⇩

युझर नेम आणि पासवर्ड वापरून अकाउंट लॉग इन करून माहिती भरा

अन्यथा नविन अकाउंट क्रिएट करून माहिती भरा.

⇩

**Citizen Portal /नागरिकांसाठी सेवा** सदर टॅबमध्ये विविध ऑनलाईन सेवा उपलब्ध आहेत.

- भाडेकरू/ Paying Guest पडताळणी विनंती
- चारीत्र्य प्रमाणपत्र विनंती
- घटना कार्यक्रम विनंती
- निषेध संप विनंती
- मिरवणूकीची विनंती
- नोकर पडताळणी
- घरगुती नोकर पडताळणी
- सी-फॉर्म
- ऑनलाईन ग्रंथालय
- आमच्याशी संपर्क साधा
- ई-फॉर्म डाउनलोड व सादर करा
- वाहनाची चौकशी
- सार्वजनिक गणेशोत्सव परवानगी अर्ज
- सार्वजनिक नवरात्रौत्सव परवानगी अर्ज

⇩

भाडेकरू/ Paying Guest पडताळणी विनंती या टॅब ला क्लिक करा

⇩

भाडेकरू/ पडताळणी तपशील समाविष्ट करा

⇩

सदर माहिती भरताना संबंधीत पोलीस स्टेशन सिलेक्ट करा

⇩

सर्व Online Services पोलीस स्टेशनचे **SHO CCTNS Log in** मध्ये उपलब्ध आहेत